
एकट पाखरा
सावित्री जगदाळे

# एकट पाखरा

सौ. सावित्री जगदाळे

राजश्री प्रकाशन
पुणे

प्रकाशक-

रामचंद्र जोरवर

राजश्री प्रकाशन,

२३ नानक निवास, बालाजीनगर,

धनकवडी, पुणे-सातारा रोड, पुणे - ४११ ०४३.

◆

© सौ. सावित्री जगदाळे

न्यू पॅलेस परिसर, पोस्ट ऑफिसजवळ,

अंकुर A-9, दुसरा मजला,

कोल्हापूर

फोन -

◆

प्रकाशन दिनांक- ९/१०/२००३ (कोजागिरी पौर्णिमा)

◆

अक्षरजुळणी-

प्रेस सिस्टीम, पुणे

◆

मुद्रक-

एस्. जयकुमार आणि कंपनी प्रा. लि. पुणे

◆

मुखपृष्ठ- मिलींद सोनावणे

◆

मूल्य- ५०रुपये फक्त.

*जन्म देऊनी दाखविली दुनिया।*
*पालनपोषण करूनी केली अपार माया।*
*तुम्हीच ईश्वर या जगती।*
*थोर उपकार आम्हावरती।*
*कसे व्हावे उतराई*
*वात्सल्यमूर्ती अण्णा-ताई।*
*ही शब्दफुले अर्पण करत्येय*
*तुमच्या चरणी।।*

... सौ. सावित्री जगदाळे.

# - आभार -

● गुरुतुल्य प्रा. अनुराधा गुरव

तुमच्या मार्गदर्शनाशिवाय पुढं पाऊल टाकणं केवळ अशक्य.

● मिलींद सोनावणे

तुझ्या सहकार्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच.

● श्री. हणमंतराव जगदाळे (पो. इन्स्पेक्टर)

आयुष्याच्या वाटचालीत तुमची सोबत, या लेखनकार्यात तुमचाच हातभार, तुमच्यामुळेच सगळ्या कल्पना साकारल्या. स्वप्न सत्यात उतरले.

*... सौ. सावित्री जगदाळे.*

# अनुक्रमणिका


| अनुक्रमणिका | पान नं. |
| --- | --- |
| १. केसरी पुनव | ७ |
| २. खळाळ | ९ |
| ३. लकाकी | १० |
| ४. अंधारकृष्ण | ११ |
| ५. तुम्ही आलात की... | १२ |
| ६. अरुणा धोत्रे | १४ |
| ७. अन्नदान | १६ |
| ८. तहान | १७ |
| ९. तुच व्हावे आता घार! | १९ |
| १०. घाव | २० |
| ११. अशक्त नाते | २२ |
| १२. दुरावताना | २३ |
| १३. पाचोळा | २४ |
| १४. अपूर्व लेणे | २५ |
| १५. चिमुटभर फुलपाखरू | २६ |
| १६. पान्हव | २७ |
| १७. शिवाजी सावंत यांस... | २८ |
| १८. ... तिथे कुणाची कुणाला ओळख असते? | ३० |
| १९. पार्थिव घट (गझल) | ३२ |
| २०. शोकमग्न पेच | ३३ |
| २१. ओला धाक | ३५ |
| २२. एकट पाखरा... | ३६ |

२३. दिलासा ३७
२४. तुझ्याशिवाय... ३८
२५. पारखी ४०
२६. असं झाड... ४१
२७. अंगार ४३
२८. अश्वत्थाम्याचे वारस ४४
२९. मृत्यूकडे झेपावताना... ४५
३०. ... सुरूच्या झाडाखाली... ४७
३१. खेचूनी आणला निळा सावळा ४९
३२. उखाणे ५३
३३. प्राजक्त फूल ५५
३४. कातरवेळी ५७
३५. शिरीषा... ५९
३६. आशा ६०
३७. बंध-मुक्तीच्या किनाऱ्यावर... ६१
३८. चंद्र ६२
३९. कृष्णार्पण ६३

## १. केसरी पुनव

झळके का चंद्र गगनाच्या कोंदणात
फिरे लक्ष्मी पुनवेच्या चांदण्यात

कोजागर्ती, कोजागर्ती मनास पुसे
केसरी दुधात हळूच चंद्र स्निग्ध हसे

अश्विनातल्या नितळ निळाईच्या अंबरात
उगवतीचा चंद्र मंद केसरपणात

नक्षत्रांनी सजून आली उदार सारी
अमृत वर्षवत पुनव कोजागिरी

अंगणात माझ्या चांदणे केसरी
धुंदगंधीत बहरली वेलीवरती रातराणी

आटीव दुधात विरघळली केसरकाडी
कोजागिरीचा चंद्र अमृत ढाळी

हेमंत आला बाई गारव्यात झुलत
मंद वारा गातो साजणगीत

झळके हा चंद्र गगनाच्या कोंदणात
फुलले चांदणे प्रितीच्या मनामनात

❖❖❖

## २. खळाळ

निराकार स्तोत्रात सगळे
राहिले प्राक्तन व्यापून
काही आकळेना भाव
जीव होतो व्याकुळ

असंभवाची धरितसे आस
असे कसे हे मन नाठाळ
देहाची थकली गात्रं
पहात मनाचा खळाळ

आवरेना मन कायेला
विश्व घेतले कवेत
पहात उंडारणे भरले डोळे
गळाले आसू पहाटेच्या हवेत

अशी बावरली राधा
धून ऐकून वेळूच्या बनात
कानात आणले प्राण
कृष्णाची जाग मनात

❖❖❖

# ३. लकाकी

आजच दिसला बहर फुलांचा
चैतन्य बोलले सूर्याचे
रोज मी जळतोच आहे
तुला फुलत जगायचे

सोवळ्या वृक्षावरती
कोवळ्या लवलवीचा साज
हुरहुरत मावळती किरणे
लाटावरची ऐकवित झांज

सांजसमयीचा मंद गारवा
शिरीष एकटा फुललेला
भगवे क्षितिज भिडताना
परतीची पाखरे ओढ पिलाला

खोल तळातून...
उगवून येते लकाकी
कृष्णतमात मावळे
आभाळमनाची एकाकी

❖❖❖

## ४. अंधारकृष्ण

दुःखाचा टाकूनी भार
राहिले मी मोकळी मोकळी
नागव्या पायांनी तुडवत डोंगर-दरी
वेदनेची भरली बुरी भली झोळी

नात्यांची फुले कोमेजली
निरगाठीही अशा सैलावल्या
तरी हे तळाशी गोठणं
अंतरीच्या डोहात आशा आंदोळल्या

धून येईना बासरीची
हाती गवसेना माळ प्रकाशाची
मन रानभरी पाखरू
ओढ लागे आकाशाची

सांज आली सोबतीला
अंधाराचं लेवून भय
काजळरातीच्या घनगर्द रूपात
सावळ्या अंधारकृष्णाची सय

❖❖❖

## ५. तुम्ही आलात की...

तुम्ही आलात की पाऊस पडत असतो
मातीला सुगंधी गारवा मिळत असतो
थोडे हातपाय पसरून आम्ही रिलॅक्स होतो
तुमचा आधारच तसा भरभक्कम असतो

तुम्ही आलात की आभाळ ओथंबलेलं असतं
भर दुपारी सूर्यही ऊन झाकत असतो
वाऱ्याला सुखद लडी लगडलेल्या असतात
जडावल्या पापण्यात आम्ही थोडं रेंगाळत असतो
तुमच्या ममतेचा झराच तसा भरून वाहत असतो

तुम्ही आलात की सगळं कसं भारावून जातं
माळरान हसते डोंगरही मोहरतो
काटेही माना टाकत असतात
तुमच्या पाऊल स्पर्शासाठी रस्ता आसुसतो
तुमच्या असण्याने आम्ही निर्भय होतो

तुम्ही आलात की आरसपानी आठवांचे सर लखलखतात
वाफाळलेला चहा अन् भजी चाखण्यात आम्ही रमतो
बिघडलेल्या पोटावर उतारा तुमचाच असतो
तुमच्या चैतन्याने आम्ही सळसळत असतो

नभ निळाईचे थेंबा थेंबात सुखवितो
तुम्ही आलात की पाऊस पडत असतो
तुम्ही आलात की पाऊस पडत असतो

❖❖❖

## ६. अरुणा धोत्रे

खोल पार्थिव गाभाऱ्यात
अनादि आदिमायेचं कूळ
रुजलंय सुजाण हृदयात
लसलसत्या वेदनेचं मूळ

अंगागात विस्तारून बोचऱ्या डहाळ्यांनी
घेतलाय ताबा पेशी पेशीवरती
डोळ्यात फुलं प्राजक्त आसवांची
दुःखी मनाचे गाणे हसऱ्या ओठावरती

सगळीकडेच भरून राहिलंय
नाही जातपात नाही भेदभाव
सोशिकतेचं धरणी बळ
राखायचंय आदिमकुळाचं नाव
रोजच इंगळावरून चाल
वंशाचे करीत रक्षण
सापाचे गरळ झेलीत दंश
रोजच विषाचे भक्षण

गढूळलेल्या डोळ्यात जन्माचे दुःख
उरात सल नाही त्याला अंत

युगायुगाची काटेरी वाट रक्ताळलेली पावले
आयुष्याचं रणांगण जखमा अनंत

आसवांच्या खाऱ्या गरम थेंबात
धगधगणारे ज्वालामुखी विसावते मन
नवे घाव नवे संकट झेलण्या सिध्द
नवी शक्ती अपार बळ सोशीत दुःखाचे घन

❖❖❖

## ७. अन्नदान

उपकार तुझे बाई
रागवावे तरी कसे
अपेक्षांच्या बोलीवर
फेडावे कर्ज हे असे

मिंधेपणाने मी लाचार
नको धरू ग ओलीस
अन्नदानाचे लेवून अलंकार
तुकडे पाडतेस हिणकस

पाणी फिरते ग तुझ्या
भाबड्या भलेपणावर
मिजास मिरवताना
नम्रतेला नको आणू चव्हाट्यावर

बूज राखावी ग बये
ज्याच्या त्याच्या परिस्थितीची
बेलगाम घोडे उधळताना
नजर राहते पार्थसारथीची

❖❖❖

## ८. तहान

देवा मला लागली रे तहान
सांग आता कसा ठाव शोधू?
खोल खोल किती विहीर
सांग सागरात कुठे खोदू

धर नाही रे धरतीला
तिने पेलले आभाळ
आभाळची कोसळताना
दयाघना तूच रे सांभाळ

मेणूळीची फरफरते ज्योत
थोडीशी तुझी फुंकर
नको सैराट वावटळ
अंधार होऊ दे ना सुकर

वाळवंटाची शेज मिळाली
करवती भिंगरीची उरात घुसळण
उभ्या वणव्यात जळते
तरी निखाऱ्यांचीच उधळण

कुठेच दिसत नाही हिरवळ

मार्गी कोसळलेल्या दरडी
अपार थकले गात्रंन गात्रं
आता बांधावी तिरडी

प्रगाढ निद्रेला कवटाळतानाही
दुःखातले भय गळा आवळते
तूच दयाघना सांभाळ
सारे जगणेच असे का कोसळते

# ९. तूच व्हावे आता घार!

पंख तुझे कोवळे अजून
तुझ्या झेपावण्याकडे माझी दिठी
आभाळाकडे लागले डोळे
तुझी मात्र पायाशी मिठी

सोड हा दुबळा हळवेपणा
भरून घे शक्ती या अजाण बाहूत
बलदंड धैर्याने झेल नवयुगाची आव्हाने
भविष्याचा वेध घे कणखर कवेत

आईची माया असते वेडी
आयुष्याची असते ही शिदोरी
याच बळावर तुला
घ्यायची आहे उंच गगन-भरारी

ज्ञानाच्या उधळलेल्या दिशांवर
व्हायचंय तुला स्वार
प्रत्येक मातृत्वाची ही आस
तूच व्हावे आता घार!!
तूच व्हावे आता घार!!!

❖❖❖

## १०. घाव

अहंतेच्या काठिण्यावरून
पावसाळा वाहूनच जाईल?
सूर्य ढळलेला नाही तरी
अंगणात गारवा राहील?

आरामदायी जगण्यात
थकलेली गात्रं
विसावा देणारी फक्त
एकच ती काळ रात्र

निवडुंगाच्या वाऱ्यालाही
असतो कधी कधी गोडवा
माळावरच्या मातीनेही खोल
ज़पलेला असतो ओलावा

आभाळात झेपावताना
उन्हंही होतात कोवळी
नाही कुणी विसावयाला तरी
गारच राहते सावली

सगळ्याच दिशा मोकळ्या

क्षितिजाने घातली मर्यादा
सागराची गाज घुमते
किनारा न ओलांडता

जुन्या पुराण्या घरट्याचा
पक्षांनी सोडला ठाव
सुन्या झाडावरून वाहताना
वाऱ्यालाही बसतात घाव

❖❖❖

## ११. अशक्त नाते

पाण्यात सोडून पाय मोकळे
भिरभिरता मनात भोवरा
बांधून घातले भावनेला
मोकळा राहिला किनारा

सोडून निबरपणाच्या जाचाला
करपून गेला कोवळेपणा
मुलांना नव्हते ठावे
अंगरस पिताना

पिळवटून वेदनेच्या तळाशी
कळ्यांचे उमलणे थांबलेले
न फुलताच सरले
दिवस भोगूनी जगण्याचे

तोडूनच टाकायचेत सगळे बंध
विरलेल्या धाग्यांच्या नकोच निरगाठी
हवेत कशाला अशक्त नात्यांचे संबंध
सोडून द्या वाऱ्यावर मुक्त फडफडण्यासाठी

❖❖❖

## १२. दुरावताना

दिवस चांदण्यांचे सरलेले
चंद्राचे झडत जागे कणाकणाने
तुझ्या माझ्यातला स्नेहाळ धागा
घनगर्द अंधाराबरोबर पातळ होत जाणे

लुप्त झालेल्याच आहेत सावल्या
रातकिड्याचं किरकिरणं सलणारे
आपल्या आपल्यात समजून घेणं
मने दुरावताना केव्हाच संपलेलं

तमभरल्या आभाळात बावरल्या दिशा
भणाण वारा स्पर्शनी जाय
क्षितिजाच्या अंगणातल्या दिव्यांना
पुसत होती दुरात तुम्हाला दिसते काय?

जगणे असे, वाळवंटी दिवस
दुखऱ्या संचिताच्या सावल्या पायापाशी
विसरा आता मला... कधीही
शिशीराचं गाणं गावं कुणापाशी?

❖❖❖

## १३. पाचोळा

निरपून काढले तरी
स्निग्धता कायम राहते
समांतर धावताना अनोळखी
हृदयाच्या एका कप्प्यात तूच झिरपते

हवाहवासा तो ओलावा आणि तैलता
त्यानेच आला हा निसरडेपणा
गळून गेले ते दिवस हिरवाईचे
आता फक्त पाचोळ्याचा कोरडेपणा

गारठलेला वारा सोसताना
गात्रागात्रात आलेला नागडेपणा
तुझ्याकडे अंतर्मन ठेवून ओले
हसत खिदळत भिनवला बेडगीपणा

संचितच असे दुःखाने भरलेले
हाती फक्त काटेच आहेत उरलेले
कुठून उधळू तुमच्यावर फुले
दग्ध काळजाची वेदना डोळ्यात सले

❖❖❖

## १४. अपूर्व लेणे

सात जन्माची सोबत
सात फेऱ्यात झाली का सिध्द?
या संगतीची किंमत
सहजतेनं जगणंच करायचं का रद्द?

मलाही आहेत पंख
मोकळ्या दिशांचे मोकळे आभाळ
जाणीव नाही.... झापडं डोळ्याला
बंडखोर होताना.... तूच तुला सांभाळ

माझे असतेपणच नाकारले तर
मी होईल रे सैरभैर
तुझ्या बलदंड आधाराला झिडकारून
चौखुर उधळीन वाऱ्यावर

मातीने गाडून घेण्याचे
संपले ते जन्मफेरे
अंकुरण्यातच दडले निर्भय
मातीचे अपूर्व लेणे

❖❖❖

# १५. चिमूटभर फुलपाखरू

कसे फुटावे पंख आता
बंद कोषातील अळीला
आस आभाळाची
चिमूटभर फुलपाखराला

आगीनं डोहात जळता
धगणे साहवत नाही
चटके बसता जीवाला
मन उजाड उजाड होई

हे जगणे तळात जागता
जाणणे निजत नाही
फुलणे जीवाचे संपता
मन पाचोळा पाचोळा होई

हे सांजेचे गाणे गाता
जगण्याचा सूर गवसत नाही
अर्थ शोधता शोधता
मन उदास उदास होई

❖❖❖

## १६. पान्हव

तुझ्या उरातल्या धारांनी
मला केले चिंब
कुळाच्या दिपकांत
कष्टाचेच प्रतिबिंब

केला किती त्रागा तू
दडपले झरे गाळाने
आता कुठले पाझर
दलदलीत रुतली मने

आवर गे माये
तुझा मायेचा पान्हव
नको लेकीची आच
नको सायीची कणव

माऊलीचे मिरवीत थोरपण
दिले तू पंखांना बळ
पुरे ना कुशीतली ऊब
घेऊ दे कवेत आभाळ

❖❖❖

## १७. शिवाजी सावंत यांस...

त्या अगाध, अनादि पुरुषोत्तमाची
तुम्ही दिलीत नव्याने ओळख
त्या विश्वात्मक, आभाळासम हृदयाची
तुमच्यामुळेच साधली जवळीक

परमात्मा आणि आत्मशोधाचा
तुमच्याच अक्षरांनी दुवा साधला
कृष्ण जवळचा सखा वाटला
तुमच्या शब्दांनी त्याच्याशी संवाद केला

घडीव शब्दातून घडली पार्थिव ओळख
दुरूनच झाले दर्शन आपले
खंत ही आता आयुष्याची...
भेटायचे राहूनच गेले...!

जिंकण्याआधीच का फसविले काळाने?
युगाचा छावा, अचानक कसे गेलात तुम्ही?
सिंहगर्जना भिववती मरणसावल्यांना
खरे मृत्युंजय ठरलात तुम्ही

हृदयचक्र शापाविण कसे रुतले

आटली गती अवखळ रांगड्या जलस्त्रोताची
गांडीव पेलणारा खांदा धनुर्धराचा!
आज्ञा, अंतिम इच्छा युगंधराची!!

❖❖❖

## १८... तिथे कुणाची कुणाला ओळख असते?

जन्मदात्याची आठवण येताना
तुझी झाकोळलेली काया दिसते
अस्तित्वाच्या खुणा नाहीत पुसत
इथं तिथं मूर्ती दिसत असते

तुझं गदगदलेलं झाड पाहताना
त्यांनी एवढ्या लवकर जायला नको होतं
असं वाटत सारखं राहतं...
पण नियतीपुढं कुणाचं ग चालतं?

आता नाही आम्हाला बाप
बघवेना तुझा अनावर विलाप
तुजभोवती त्यांच्या आत्म्याचा वास
नको मानूस तू वैधव्याचा शाप

तुला सोडून त्यांना नव्हतेच ग जायचे
भरल्या कपाळाने जायची तुला ग का घाई
बापाविना आम्ही वनवासी पोरके
तू तरी नको करूस भिकारी, आई!

जगायलाच हवं आमच्यासाठी तरी दीर्घकाळ

मरणाची वाट तुडवायचीच असते ग
पण आता भरल्या घराला सोडून जाऊ नको
तिथे कुणाचीच कुणाला ओळख नसते ग

❖❖❖

## १९. पार्थिव घट (गझल)

तुझ्या जाण्याने कळून चुकले
मृत्यू किती समीप खडा आहे

दुःख करायलाही वेळ नाही
आयुष्याचा कोसळणारा कडा आहे

आत्म्याच्या गाभाऱ्यात धूप कोंदटलेला
घुसमटणाऱ्या भयकंपीत मनाचा लढा आहे

खोल खोल डोहात तळ ठोकून बसलेल्या
फडफडत्या मनाचा चाळा वेडा आहे

अर्थहीन जगण्याचा माज चढा आहे
मेल्यानंतर तुला मान थोडा आहे

उपेक्षा अवहेलना जिवंतपणी चैतन्याला
राखेच्या पार्थिव घटाला हा तडा आहे.

❖❖❖

## २०. शोकमग्न पेच

दुःखाने पोळल्या मनाला
भयव्याकुळ शोकमग्न पेच सतावे
विसरलीस जात्यावरल्या ओव्या
त्यामध्ये गुंफणारी आमची नावे

तुझ्या शैलीदार साठवणींना
काळाचे नाही भान
आयुष्य बसलीस उसवत
लिंपून टाकलेस कान

कुठं गेलं तुझं म्हातारं?
त्या दयाघनालाच ठावे
अंतरात्म्याच्या हंबरात
नाद हरविती नथ जोडवे

तुझ्या आसवांत तडकली
चुड्यांची किणकिणमाला
आई, आवर आता शोक
गोंदणाची साथ आहे तुला

प्राक्तनाचे सल बोचतात तुला

हरलेपण ललाटावर मिरवताना
खचतोय तुझ्यातला निरामायचा डोह
पदराखाली घे आम्हाला नको विसरू आईपणा

❖❖❖

## २१. ओला धाक

अंगभर शीण पांघरलेला
कोण हलवितो झोपेतल्या देहाला?
टक्क झाले जागे डोळे
कशी आली तरतरी मनाला

किती बोलू स्वतःशी
रात्रही थकून गेली
श्रावणातली सर पावसाची
अंग सुकवून सरली

तुझ्या प्रश्नांची देता उत्तरे
गुंतवळ वाढत जाते
आई, तुझा हा धाक ओला
शुष्क होईल सायीचे नाते

नीरेचेच झाले वाळवंट
माहेराचा रिता पूल
आईच्या डोळ्यांत दाटला सागर
वडवानलाची मला भूल

❖❖❖

## २२. एकट पाखरा...

सूर्य जरासा ढळलेला
तुषारातला मृदगंधी वारा
पर्णदाट शिरीषाच्या आडोशाला
काय न्याहळीशी एंकट पाखरा

दूरदेशी तुजा सोबती
आषाढमेघ दाटले हृदयाशी
अशा सुजाण क्षितिज वेळा
एकवटल्या ओल्या दिठीशी

साचलेल्या गढूळ पाण्याने
कावळा भागवितो तहान
या अथांग ओथंबल्या मेघाखाली
पाखरासम मी भासे लहान

तुझ्या पंखात भरला वारा
मला सांभाळीते आभाळ
पाचूत मढविले संगीत पाखरांचे
सावळ्या शेल्यातून झिरपती किरणे तेजाळ

❖❖❖

# २३. दिलासा

जगताना गढून जावे कर्मात
तोच आनंद दिलासा सुखाचा
काळ भराभर सरकताना कष्टाचा
हलका होतो जरासा भार दुःखाचा

झुंबरात दडले पणतीचे अस्तित्व
दोष दुजा कुणाला द्यावा
क्षुद्रत्वाचं न्युनत्व पाचोळ्याला
एका ठिणगीने लागेल वणवा

नकोच टाळाया अवहेलना अन् उपेक्षा
त्याच्या तळाशी मारावयाची खोल बुडी
अंगाअंगात मुरवायचा मुक्त विनयीपणा
पुरून उरायचे अहंतेशी करून खडाखडी

❖❖❖

## २४. तुझ्याशिवाय...

वचन दिले होतेस
जन्मोजन्मी देईन साथ
का गेलीस सोडून
असा अर्ध्यावरच हात?

या जगण्याच्या वावटळीत
का सोडलंस एकट्याला
भोवंडून गेलंय अवघं जग
कोण आहे सावरायला

दोघांनी मिळून पाहिलेली स्वप्नं
एकटा कशी साकारू?
धरतीचं बळ तुझं
आभाळओझे कसं पेलू?

तुझ्याशिवाय जगणं
मरणाहून भयानक
कुठे गेलीस न परतीच्या वाटेवर
अशी एकाकी सोडून अचानक

तुझं प्राण पाखरू शोधाया

मारू कुठे भरारी
दाही दिशा विस्कटल्या
सैरभैर दुनिया सारी

❖❖❖

## २५. पारखी

माझ्याच माणसांना मी होते परकी
नात्याचे धागे विरता विरता
भूतकाळाला झोंबत रहातात
स्वतःच अस्तित्वाने टोकरत असतात
　　पुसट खुणाही खुणावतात
　　विस्मृतींच्या मनतळांतून उसळतात
　　धारेत वाहवताना वेगाने
　　वर्तमानाच्या धकाधकीत लुडबुडतात
आपलीच असतात ती सगळी
मी जरी नसेल कुणाची
माझ्या स्मृतींशी सदा खेळताना
आवर घालतात मुक्त फुटलेल्या बांधांना
　　ज़ीवनाचे विशालत्व खुणावते
　　ऋतू शैशवातल्या समाधानातून
　　आजचे असमाधान दुणावते
　　या टप्प्यावर मीच सर्वांना
　　पारखी... होते...
　　पारखी... होते...

❖❖❖

## २६. असं झाड...

असं झाड व्हायचंय मला
सतत वाढत राहणारे
जुनाटतेची पानझड करणारे
नवोन्मेषी पालवी उमलवणारे
बहरणारे सतत वाढणारे
वाऱ्याशी हितगुज करणारे
क्षितिजाला घालून गवसणी
उन्हाला पचवीत पावसाशी खेळणारे
फांद्या फांद्यातून सदा विस्फारत राहणारे
असं झाड व्हायचंय मला
तावून-सुलाखून, सोसून शोषून
खंबीरपणे मुळे रुतवून
जगत रहायचेय मला ताठपणे
पाय जमिनीवर गच्च रोवून
गगन भरारी घ्यायचीय मला
पिलांकडे दक्ष नजर ठेवून
आपुलकीचे-जिव्हाळ्याचे उफाळते झरे
मनी ध्यानी जपायचेत मला
आनंद लुटत आनंद वाटीत
उन्हात सावली व्हायचंय मला
असं झाड व्हायचंय मला

प्रित पाखरे खेळविणारे
पिलांची घरटी जोजविणारे
असं झाड व्हायचंय मला

❖❖❖

# २७. अंगार

उपेक्षेचे....
.... तीक्ष्ण कटाक्ष
कवटी भेदून...
मेंदूच्या अंतर्गाभ्याला...
विदीर्ण करतात
रक्तपेशी पिळवटून जाताना
अपमानाचे कढ
डोळ्यात साकळतात
त्याच्या ठिणग्या होण्यासाठी
अंगार गिळावे लागतात
या आगीत जळते
कोवळेपण अन्....
वाळलेपणही...!
काय निष्पन्न होते यात?
क्षणभर उजळणारा प्रकाश?
अस्तित्वाची चिमूटभर राख?

❖❖❖

## २८. अश्वत्थाम्याचे वारस

हक्क कधी दाखवायचाच नसतो
नाहीतर आपल्याच माणसांचे
हात उगारले जातात!

अन्यायाविरुध्द बोलायचेच नसते
नाहीतर आपल्याच माणसांचे
डोळे मोठे होतात!

तक्रार कधी करायचीच नसते
नाहीतर आपल्याच माणसांची
नखे बोचकारतात!

मनतळात रुतलेले बाण
काढताना वेदना...
... झाकण्यातही वेदना!
सोसत अदृश्य जखमांना
द्यायची असते आसवांना
मोकळी करून वाट
एकांतात....
.... फक्त एकांतात!

❖❖❖

## २९. मृत्युकडे झेपावताना...

अनेकदा घोंगावत आलेला
तोच क्षण... पुन्हा एकदा....
हुल उठवत आला...
मन, बुध्दी, शरीरावर
अवघा कब्जा केला...

क्षणात उधळून लावले
भणाणत साऱ्या आयुष्याला
स्वतःच कवटाळताना मरणाला
मृत्युंजय जगून गेला...!
मृत्युंजय जगून गेला...!
त्यालाही माहीत होते...
पुढे काहीच नसते...
वाटत असेल जगण्याच्या दलदलीतून
भयाण पोकळीचेच आकर्षण

इतकाही सोपा नसतो मृत्यू...
... जगण्याला भ्यावे...

जगण्याच्या कचकचण्यात कुणाचा तरी
... एक शब्द!

फक्त एखादा शब्द
मृत्यूचे दार उघडायला भाग पाडतो
किंवा आयुष्याची पहाट अनुभवायला शिकवतो!

जगता जगता
सगळ्यांना हसवलं
मृत्यूकडे झेपावताना
जवळच्यांना फसवलं!

❖❖❖

## ३०... सुरूच्या झाडाखाली...

शेटजी तुम्ही काय न्हाय चांगलं केलं
मला मधीच सोडून कसं जाणं झालं?

आता सांजेच्या पारी काळोखाचं भय
सोडून गेली सावली कशी पेलू सय?

दोघांत एक भेळ सरत नव्हती
रात दिसाची वेळ पुरत नव्हती

तुमच्याविण दिवस बघितला न्हाय
रात उजाडेना आता करू काय?

देऊ कशी मळलेली पाठ घासून
अंघोळीचं पाणी गेलं की निवून

शोधीत होते रानातले बांध अन् नाली
नदीकाठ, खणलेले पाट, सुरूच्या झाडाखाली

शेतातून आले ऊसाला पाणी पाजून
तुमच्या हातचा च्या पिऊन शिण जायचा निघून

निळं-सावळं रान सुनं सुनं झालं
काळवंडलं आभाळ वारं भणाणलं

आटून गेलंय निरामायचं पात्र
शेटजी थकली आता माझी गात्रं

❖❖❖

# ३१. खेचूनी आणला निळा सावळा

सावता माळी निघाला पंढरीला
विठूमाऊलीच्या दर्शनाला
''मी ही येते तुमच्याबरोबर
पाहू विटेवरच्या देवा डोळाभर''
केला हट्ट सावत्याच्या लेकीनं
''पावन होईल विठ्ठल भेटीनं
जीव माझा खालीवर
न्या मला तुम्हाबरोबर
विठोबा-रखुमाईच्या गळा घालीन तुळशी हार
कडकडून भेटताना होईल श्रमपरिहार
मायेची माऊली देते सावली
डोके टेकीन तिच्या पावली
येऊ द्या मला तुमच्याबरोबर''
पोरीनं लावला घोर
काय करू आता देवा
समजावू कसं निष्पाप जीवा
''देव असे मनात या मळ्यात
नाम घे आधी भक्ती त्याच्यात!
पोरीची जात नको दूरचा प्रवास
विठ्ठलाला भेटून आणितो तुला प्रसाद''
''नक्को मला ते चुरमुरं-बत्तासं

पायाचं दर्शन हवं सावळ्याचं!
डोळाभरून पहायाचं
मला पंढरीला यायचं!''
क्रोध आवरेना वारकऱ्याला
होता हातात त्याच्या विळा
मारिला फेकून रक्त येई भळाभळा
डोळ्यातून आसवं वाहती घळघळा
''देवा तुझा भक्त असा कसा निष्ठूर?
नाही त्याला कणव फुटेना पाझर''
आक्रंदन लेकीचे सावता ऐकेना
उशीर होतोय पंढरी निघण्या
गेला सावता माळी पंढरपूरा
पाही ना लेकीला वळूनी माघारा
व्याकुळ झाली लेक सावत्याची
''बाऽ विठ्ठलऽ कशी येऊ पंढरीशी?
सर्व शक्तीमान तू चक्रपाणी
का आणीतसे माझ्या डोळा पाणी?
दया सागरा तुला दया येईना
पंढरीला का मज नेईना?
पाहूनी राऊळाचा कळस
मगच करू नगरात प्रवेश।
चंद्रभागेत स्नान करूनी
अमंगल टाकीन धुवूनी।
वाळवंटी गाईन नाचीन

रंगूनी जाईन भजनी-कीर्तनी।
संतसंगे पाहीन सोहळा
फुललेला भक्तीच्या मळा।
धन्य ती नामयाची पायरी
मस्तकी लेवूनी पायधूळ न्यारी।
येईन तुझ्या गाभाऱ्यात
सावळे रूप तुझे हृदयात
साठवीन, डोळ्यात प्राण आणून
वेडा जीव जाईल रे हरखून
कशी येऊ आता विठ्ठला?
सोडूनी मला बाप गेला।
पोरीचा जन्म तूच दिलास
काय अपराध? सांग बापास
नाही अन्नपाणी शिवणार
तुझ्या दर्शनावीण नाही उठणार
जाऊ दे प्राण कुडी सोडूनी
ना राहीन स्त्रित्वाच्या बंधनी।
कोण अडवील मला येता पंढरी?
सावत्याची लेक बसली बांधावरी।
विठूमाऊली ती कनवाळू
करुणाकर असे दयाळू
आली देवाला कणव तिची
धावला सोडूनी वीट पंढरीची
जखम बांधूनी समजूत घातली

म्हणे, "विठ्ठल तुझ्याच अंतरी
ओळख खुण
सोड अज्ञान!"
"नाही मला दिसत साजरे रूप
सावळा पाहू कसा पंढरीनाथ?"
सोड हट्ट जाण्याचा पंढरी
हृदयाचा तुझ्या नारायण-हरी
डोळे उघडूनी पहा सामोरा
तेज फाकले उभा पांडूरंग खरा।
पाहूनी सावत्याची लेक झाली धन्य
घाली लोटांगण धरीले समचरण।
अश्रूंचा अभिषेक अश्रूंचीच फुले
भक्तीचा धूपदीप पसरे चोहीकडे
अवघ्या मळ्याचा अर्पूनी नैवेद्य
सुखे पावले दैवत आराध्य
धन्य झाला सावत्याचा मळा
खेचूनी आणला निळा सावळा

❖❖❖

## ३२. उखाणे

बर्फाच्या शिखराला
आली कशी झळाळी?
सूर्याच्या दिव्याला
कशी धरेना काजळी?

मरू घातल्या झाडाला
कशी फुटे पालवी
वाळवीच्या वारूळात
जीव जीवाला जागवी

गाडून घ्यावे जीवाने
आभाळ होण्यासाठी
पाऊस होऊन बिलगावे
मातीला रुजविण्यासाठी

पालवीचे अप्रुप पाखरांना
सोडली घरटी पंख वाढताना
जोजावणाऱ्या झाडाला दुःख
होते का पाने गळताना?

तुला पाण्याची हाव

माझी लहानशी तहान
माणुसकीच्या वेडापायी
विसरतो झाडे किती महान?

सुगंधी फुलांचा
रोज होतो लिलाव
धगधगीत गुलमोहराचा
लागला कसा टिकाव?

❖❖❖

## ३३. प्राजक्त फूल

उमलत्या फूल कोमल तारुण्याचा
प्रणयात रक्तवर्णी भोग घेताना
विसरलास...!
नाजूक आरक्तता धारदार व्यथेची
दग्ध किरणात वितळलेले
सुकुमार लज्जेचे फूल!
सगळेच जुने रसहीन वाटले तुला?
... नावीन्य पडताच दृष्टीस?
तुझे तळपते डंख...
निसटून जाताना....
... अवघा मृत्युच कवटाळला तिनं
हे प्राक्तन भुईनं रुजविले
कुशीत जोजावून वाढविले
रखरखीत दुखऱ्या झाडावर
सुकुमार कोवळ्यां प्रीतीचा बहर
साऱ्या दुनियेवर उधळला
.... पण....
तुझी गुलाबी किरणे येण्याअगोदर
तुला सन्मुख होण्याची सरलेली तृष्णा
जगण्याचीही संपलेली असोशी...
... एकेकाळचे प्रेमनिधान

जिंकल्याचे हरवलेपण
मोत्या-पोवळ्यांच्या आसवांत
गळून उरलेलं...!

निळ्या सावळ्याने धरले हृदयाशी
उपेक्षित हे गळालेले पोवळे-मोती!

❖❖❖

## ३४. कातरवेळी

चैन नाही
उदास जीवाला
आस लागली
व्याकुळ मनाला।

थाऱ्याला चित्त नाही
आग वाऱ्याला
वणव्यात चातकाचा
थेंब जळाला।

चंद्र भडकला
तापली भरती
ज्वालामुखीत दडपली
माती खालची माती।

रसरसल्या दशदिशा
मना घालिती साद
झुळझुळ त्या झऱ्याचा
ऐकू येईना नाद।

धरती धगधगते

निखारे आभाळी
युगायुगांच्या या
करकरीत कातरवेळी।

❖❖❖

# ३५. शिरीषा...

तुझा ऋतू आनंदाचा
आभाळाखाली चिंब होण्याचा।
तुझा ऋतू बहरण्याचा
पाना पानातून हसून गळण्याचा।
तुझा ऋतू पालवण्याचा
भरगच्च अंगाने डोलण्याचा।
तुझा ऋतू वादळाशी झुंजण्याचा
कडाडणारे आसूड झेलण्याचा।
तुझा ऋतू कणखर बाण्याचा
कोवळीक झाकून निबर होण्याचा।
तुझा ऋतू... माझा ऋतू
... सहजतेनं सोसण्याचा।
उन्हं पेलता पेलता
सावली होण्याचा!
सावली होण्याचा!!

❖❖❖

## ३६. आशा

हसणे तुझे उपहासाचे
कळते माझ्या अंतर्मना
तरी खडा टाकूनी पहावा
नशीब अजमावताना

विश्वासून आहे मी
ढोंगालाही किनार खरेपणाची
घनदाट अंधाराला उजाळते
ज्योत इवलीशी समईची

नसताना यशाची खात्री
खेळणेच सोडायचे का?
करताना जिंकण्याची धडपड
धोक्याचीच उजळणी करावी का?

नसेल मीठ माझे अळणी
फुटतील अंकुर वाढण्यासाठी
प्रयत्नात पालवती आशा
जगताना श्वास घेण्यासाठी।

❖❖❖

## ३७. बंध-मुक्तीच्या किनाऱ्यावर...

तुझा दुरावा साहवत नाही
तुझी जवळीक पेलवत नाही
करंटीच मी रे...
तुझ्या प्रेमाला पालवत नाही

तू होतोस मोकळा
मी धरबंध सोडलेला
बंधनातीत माझे सौंदर्य
परंपरेत तू अडकलेला

स्पर्शात तुझ्या जादू
भावना ओलावल्या ओठी
शब्दांचीच मी वेडी
अक्षरांना मारते गाठी

जन्मोजन्मीच्या रेशीम गाठी
विचारांवर मांड तुझी पक्की
बंध-मुक्तीच्या किनाऱ्यावर
नांगर टाकणार मी नक्की

❖❖❖

## ३८. चंद्र

आतड्यांना पीळ
काळजात कळ
दुखरे क्षण
खोलवर तुझेच खूळ

तू सुखावले
मी धुंदीत दंग
तू दुखावले
मी मनाशी तंग

तुझ्या दुराव्याचा
लागेना थांग
युगायुगाचा अनंत
वाटे उदास सणंग

अंगभर घेतले गोंदून
पाठीवरती कोरले चंद्र
कोसळला संग
मिठीत तुझ्या सांद्र

❖❖❖

## ३९. कृष्णार्पण

नाही आता ओझे
दिल्या घेतल्याचे
सैलावले बंध आता
नात्या संबंधांचे

आस अशी मुक्तपणाची
खळाळत्या खोल गंगेची
ओढ लागली
अथांग सागराची

किनाऱ्यावरच्या जीवांनो
व्हा तृप्त होऊन चिंब
राहिले साहिले करा
आता सर्व कृष्णार्पण

नाही आता अडखळणे
खळगे भरून पुढेच वाहणे
क्षितिजाला घेत कवेत
विश्वसागरात विरघळणे

आत्म्याच्या गर्भगारात
स्वाभाराची घुमते गाज

सागराची घुमते गाज
लाटावरती झिळमिळ
शुभ्र चंदेरी सजला साज

❖❖❖



## आमची आगामी प्रकाशने

| | |
|---|---|
| सांजवेळी – | यादवसुत |
| कुंडली माझ्या वहिनीची – | अरूण हरकारे |
| संघर्षातून संघर्षाकडे – | वसंत गोविंद खेर |
| रसिया – | वसंत गोविंद खेर |
| स्वप्नमुग्धा – | वसंत गोविंद खेर |
| धर्मसंकट – | माणिक पटवर्धन |
| मुलाखतीचे शास्त्र – | संजय बा. नाईक |
| थॅटिंग – | डॉ. राजेंद्र धामणे |
| समर्थ विरंगुळा – | सु. शं. देशमुख |
| परिणिता – | डॉ. सौ. मृणालिनी पोतनीस |
| शंकासुर – | सुनिल तावडे |
| झोळी आणि खराटा – | मधुकर अंबरकर |
| एकांकीका – | विजया राजे |
| एकट पाखरा – | सावित्री जगदाळे |
| सफर मंगळावरची – | सावित्री जगदाळे |

राजश्री प्रकाशन
पुणे